पत्रकार नगर

रजि.नं. पी.एन.ए./एच.एल.जी /६५८/३१-१-१९७१

# पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)

कार्यालय : पत्रकारनगर, सिंधू इमारत, पुणे ४११ ०१६.

12-12-2021

पुनर्निर्माण(रिडेव्हलपमेंट) ठराव मंजूर

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित) या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा 12 डिसेंबर 2021 रोजी संस्थेच्या समाजमंदिरातील मधुकर जोशी सभागृहात पार पडली. त्यात वर सह्या केलेले 76 सभासद उपस्थित होते.

38 सभासद संख्येची गणपूर्ती (कोरम) लगेचच पूर्ण झाल्याने सभेचे कामकाज सुरू करण्यात आले. अध्यक्ष विजय सावंत, व सचिव विनायक पटवर्धन यांनी विषयासंबंधीची माहिती देऊन प्रथम विषय क्रमांक एक साठी आवाजी मतदान पुकारले. यावेळी श्री. एकनाथ बागुल यांनी तटस्थ असल्याचे सांगितले. विरोधी शून्य मते आणि पुनर्विकासाला होकारार्थी अशी 73 मते पडली. यासंबंधातील लेखी मतदानात 73 होकारार्थी, 2 नकारार्थी आणि 1 तटस्थ अशी विभागणी दिसली. त्यानंतर चिटणीसांनी विषय क्र. 2 सभेपुढे ठेवला व पंच समितीने आतापर्यंत चर्चा केलेल्या 11 आर्किटेक्टची नावे वाचून दाखवली. त्यानंतर, ज्या चार आर्किटेक्टनी पुनर्निर्माण विषयाची फिजिबीलीटी (व्यवहार्यता) तपासण्यासाठी लेखी प्रस्ताव सादर केलेले आहेत त्यांच्यातील एका आर्किटेक्टची

अध्यक्ष
ॲड. विजय सावंत
( फोन: २५६५ ७४०० )

चिटणीस
विनायक पटवर्धन
( फोन: २५६५ ४८९० )

पंचसमिती
ॲड. अनंत शालिग्राम
( फोन: २५६५ ८४०० )
सुनीकान्त ठाकोर
~~सदाशिव कुलकर्णी~~
( फोन: ~~[illegible]~~ )
(9821092328)
विजय लेले
( फोन: २५६५ ०६७२ )
अनंत बेदरकर
( फोन: २५६५ ७१९६ )
प्रदिप नेवाळकर
( फोन: २५६७ ३६४२ )
राजाराम जोशी
( फोन: २५६५ ६८९५ )
श्रीमती अरुंधती भिडे
( फोन: २५६५ ७१९६ )
श्वेता बालडेकर
~~श्रीमती मृदुला कुलकर्णी~~
( फोन: ~~२५६५ ५५६६~~ )
(9922913364)

नेमणूक सभेने करावयाची आहे असे त्यांनी सभेला सांगितले. त्यावेळी, सभेने अनिरुद्ध वैद्य असोसिएटस् ह्या आर्किटेक्ट फर्मचे नाव मंजूर केले व त्याचबरोबर त्यांची व्यवहार्यता अहवालासाठीची फी रु. 60,000/- देण्यास संमती दिली. या विषयासाठी 75 अनुकूल आणि 1 तटस्थ अशी मतविभागणी झाली.

त्यानंतर, शासकीय नियमानुसार उपस्थित सभासदांनी पुनर्निमाणाविषयीचे(रिडेव्हलपमेंटबाबतचे)लेखीमत नोंदवावे असे अध्यक्षांनी सांगितले, त्याप्रमाणे, 76 सभासदांनी आपले लेखी मत नोंदवले.

यानंतर ही विशेष सर्वसाधारण सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

चिटणीस

अध्यक्ष 12.12.